# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 14 January 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ जानेवारी २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- देशाचा प्रत्येक भाग, प्रत्येक कुटुंब प्रगतीपथावर वाटचाल करेल तेव्हाच विकसित भारताचं स्वप्न साकार होईल – पंतप्रधानांचं प्रतिपादन
- सोयाबीन खरेदीसाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारण्याची मुख्यमंत्र्यांची सूचना
- प्रयागराज इथं महाकुंभमेळ्याला प्रारंभ – पहिल्या दिवशी सुमारे दीड कोटींहून अधिक भाविकांचं कुंभस्नान
- मकरसंक्रातीनिमित्त बाजारपेठांमध्ये उत्साह

आणि

- डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ३१ व्या नामविस्तार दिनानिमित्त आज विविध कार्यक्रमांचं आयोजन

****

देशाचा प्रत्येक भाग, प्रत्येक कुटुंब प्रगतीपथावर वाटचाल करेल तेव्हाच विकसित भारताचं स्वप्न साकार होईल, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. जम्मू काश्मीर मध्ये श्रीनगर– सोनमर्ग मार्गावरच्या बोगद्याचं काल पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण झालं, त्यावेळी ते बोलत होते. या बोगद्यामुळे श्रीनगर आणि सोनमर्गदरम्यान बारमाही संपर्क कायम राहून पर्यटनाबरोबरच रोजगार निर्मिती, आरोग्य सुविधा यानांही चालना मिळेल, असा विश्वास त्यानीं व्यक्त केला.

दरम्यान, पंतप्रधान उद्या महाराष्ट्र दौऱ्यावर येत आहेत. मुंबई इथं नौदलातील आयएनएस सूरत, आयएनएस नीलगिरी आणि आयएनएस वागशीर या तीन लढाऊ जहाजांचं जलावतरण त्यांच्या उपस्थितीत होणार आहे. नवी मुंबईत खारघर इथल्या

श्री श्री राधा मदनमोहनजी या इस्कॉन मंदिराचं उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

****

दर महिन्याच्या अखेरच्या रविवारी आकाशवाणीवरून प्रसारित होणारा मन की बात हा कार्यक्रम या महिन्यात येत्या रविवारी १९ तारखेला प्रसारित होणार आहे. या कार्यक्रम मालिकेचा हा ११८ वा भाग असेल. या महिन्याच्या शेवटच्या रविवारी प्रजासत्ताक दिन आल्यामुळे हा बदल करण्यात आला आहे.

****

पणन विभागामार्फत सोयाबीन खरेदीसाठी कायमस्वरूपी यंत्रणा उभारण्यात यावी, अशी सूचना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. विभागाकडून १०० दिवसात करण्यात येणाऱ्या कामाचा आढावा घेताना ते काल बोलत होते. राज्यात विविध ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या कृषी साठवणूक केंद्राचा प्रस्ताव सादर करावा, कांदा साठवणुकीसाठी कांदा चाळींची संख्या वाढवावी अशा सूचनाही फडणवीस यांनी दिल्या.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या जाभूरगाव इथं कृषी केंद्राची उभारणी पूर्ण झाली असून, येत्या ४५ दिवसात त्याचं लोकार्पण करण्यात येणार असल्याचं पणन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा यांनी यावेळी सांगितलं.

शालेय शिक्षण, पर्यटन, दळणवळण, महाज्योती आदी विभागांच्या १०० दिवसांचा आराखड्याचा आढावाही मुख्यमंत्र्यांनी काल घेतला. राज्य अभ्यासक्रम आराखड्याची पुढील वर्षापासून अंमलबजावणी, पीएम श्री शाळा योजनेच्या धर्तीवर प्रत्येक क्लस्टरमधून एका शाळेचा सीएम श्री शाळा म्हणून विकास करणं, शिक्षक भरती प्रक्रिया जलदगतीने राबवणं, पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पर्यटन पोलिसांची नियुक्ती, अजिंठा वेरूळ पर्यटन विकास कामांना गती देणं, पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पर्यटन पोलिस नेमणं, राज्यात पाच ठिकाणी शिवसृष्टी थीम पार्क उभारणं आदीसंदर्भात मुख्यमंत्र्यांनी संबंधितांना सूचना केल्या.

शासनाच्या महत्त्वकांक्षी शक्तीपीठ महामार्गाच्या कामाचं नियोजन सर्वांना विश्वासात घेऊन तत्परतेने सुरु करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

****

राज्यात अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना करणार असल्याचं, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी सांगितलं आहे. ते काल नाशिक इथं वार्ताहरांशी

बोलत होते. प्रत्येक आश्रमशाळा, वसतिगृह हे विभागाच्या सचिवांपासून प्रकल्प अधिकाऱ्यांपर्यंत प्रत्येक अधिकाऱ्याला दत्तक देऊन, संबंधितांनी महिन्यातून किमान एकदा प्रत्यक्ष मुक्कामी भेट देत तिथल्या व्यवस्थेची खातरजमा करून घेण्याचे आदेश दिल्याचं, ऊईके यांनी सांगितलं.

****

महाकुंभमेळ्याला कालपासून प्रारंभ झाला. उत्तर प्रदेशातल्या प्रयागराज इथं काल पौष पौर्णिमेपासून सुरु झालेला हा कुंभमेळा पुढचे ४५ दिवस म्हणजे महाशिवरात्रीपर्यंत सुरु राहणार आहे. गंगा, यमुना आणि गुप्त सरस्वती या नद्यांच्या पवित्र संगमात काल पहिलं शाही स्नान झालं. काल सायंकाळपर्यंत सुमारे दीड कोटींहून अधिक भाविकांनी संगमावर स्नान केल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. आज मकर संक्रांतीच्या मुहूर्तावर विविध आखाड्यांचं अमृत स्नान सुरु झालं. महाकुंभ मेळ्यासाठी भारतीय रेल्वेनं पाच हजार कोटी रूपयांची गुंतवणूक केली आहे. यातून नवीन पायाभूत सुविधा आणि विद्यमान सुविधांचं अद्ययावतीकरण करण्यात आलं असल्याचं, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

****

सूर्याचा मकर राशीत प्रवेश तसंच दक्षिणायनातून उत्तरायणात संक्रमणाचं पर्व, मकरसंक्रांतीचा सण आज साजरा होत आहे. या दिवशी परस्परांना तीळगुळ वाटपाचा तसंच महिलावर्गात सौभाग्यदानासह मातीच्या सुगड्यांमधून विविध वस्तूंचं वाण देण्याचा प्रघात आहे. या पार्श्वभूमीवर बाजारपेठा विविध पूजा साहित्यासह ऊस, बोरं, हरभरा आणि इतर साहित्यानं फुलून गेल्या आहेत.

मकरसंक्रांतीला पतंग उडवण्याची परंपरा आहे, या निमित्तानं विविध प्रकारच्या पतंगांनी दुकानं सजली आहेत. पतंगाच्या खरेदीसाठी आबालवृद्धांचा उत्साह दिसून येत आहे. नायलॉनचा मांजा विक्री करणाऱ्यांवर पोलीस कडक कारवाई करत असून, असा मांजा वापरू नये यासाठी शहरातल्या अनेक चौकात वाहतूक पोलिसांकडून भोंग्याच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

> ''**नायलॉन मांजा मुळे पक्षी, सामान्य जनता सर्वाधिक जखमी होतात म्हणून नायलॉन मांजाची खरेदी अथवा विक्री होत असतांना तसंच नायलॉन मांजाच्या सहाय्याने कुणी पतंग उडवत असल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.**''

नायलॉन मांजाचा साठा, विक्री आणि वापर केल्याचं आढळल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाईसोबतच गरज भासल्यास गुन्हा दाखल करण्यात येईल, असं छत्रपती संभाजीनगर महापालिकेनं कळवलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ३१ वा नामविस्तार दिन आज साजरा होत आहे. यानिमित्तानं सर्वत्र विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. नाशिकच्या डॉ बी आर आंबेडकर एस सी, एसटी महासंघाच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ इंदिरा आठवले यांचं आज सकाळी साडे दहा वाजता विद्यापीठाच्या सभागृहात व्याख्यान होणार आहे.

****

पहिल्या खो–खो विश्वचषक क्रीडा स्पर्धांना कालपासून नवी दिल्लीत सुरुवात झाली. १९ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत २३ देशांचे ३९ संघ सहभागी झाले आहेत. काल सलामीच्या सामन्यात भारताने नेपाळचा ४२ – ३८ अशा गुण फरकाने पराभव केला. महिला संघाची सलामीची लढत आज कोरिया संघासोबत होणार आहे.

****

अहिल्यानगर इथं २९ जानेवारी ते दोन फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेची तयारी सुरू झाली आहे. केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते काल या स्पर्धा मैदानाचं मातीपूजन करण्यात आलं.

****

बीड जिल्ह्यातले मस्सजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येशी निगडित खंडणी प्रकरणी अटक झालेल्या वाल्मिक कराड विरोधात मकोका अंतर्गत कारवाई करावी या मागणीसाठी देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी काल मस्साजोग इथं पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केलं. या आंदोलनात देशमुख कुटुंबासह गावकरीही सहभागी झाले होते. पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी देशमुख यांच्याशी संवाद साधला, त्यानंतर हे आंदोलन तुर्तास मागे घेण्यात आलं.

****

दरम्यान, संतोष देशमुख हत्या प्रकरणात स्थापन विशेष तपास पथकात बदल करण्यात आला आहे. जुनं पथक बरखास्त करुन आता या पथकात बीड चे पोलिस

उपअधिक्षक अनिल गुजर, छत्रपती संभाजीनगर इथल्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या अपर पोलिस अधिक्षक किरण पाटील यांच्यासह पुणे इथल्या अधिकार्यांचा समावेश आहे.

****

बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी काल केज इथं पत्रकार परिषद घेतली, देशमुख यांच्या हत्या प्रकरणांतल्या सर्व दोषींवर कठोर कारवाई होत नाही तोपर्यंत शांत बसणार नसल्याचं, सोनवणे यांनी सांगितल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

बीड जिल्ह्यात आजपासून २८ जानेवारीपर्यंत जमावबंदी आदेश लागू करण्यात आले आहेत. जिल्ह्यात सध्या सुरू असलेली आणि नियोजित असलेली विविध आंदोलनं, आणि त्यातून उद्भवणारी संभाव्य परिस्थिती या पार्श्वभूमीवर हे आदेश लागू करण्यात आले आहेत.

लातूर जिल्ह्यातही अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी शस्त्रबंदी तसंच जमावबंदी आदेश जारी केले आहेत.

****

धाराशिव इथं पोलीस दलात उल्लेखनीय कामगिरी करणारे पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा काल सत्कार करण्यात आला. पोलीस अधीक्षक संजय जाधव यांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन या अधिकारी तसंच कर्मचाऱ्यांना गौरवण्यात आलं.

****

तुळजापुरच्या श्री तुळजाभवानी देवीच्या शाकंभरी नवरात्राची काल घटोत्थापनाने सांगता झाली. यानिमित्त मंदीराच्या मुख्य गाभाऱ्याला विविध फुलांची आकर्षक आणि सुंदर सजावट करण्यात आली होती. काल मोठ्या संख्येनं भाविक तुळजापुरात दाखल झाले होते.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या विवेकानंद महाविद्यालयात १६ ते १८ जानेवारी दरम्यान विवेकानंद व्याख्यानमालेचं आयोजन करण्यात आलं आहे. व्याख्यानमालेचं हे सातवं वर्ष असून महाविद्यालयाच्या प्रांगणात दररोज संध्याकाळी सहा वाजता होणारी ही व्याख्यानं सर्वांसाठी खुली आहेत.

****

अहिल्यानगर जिल्ह्यात राळेगण सिद्धी इथल्या स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी संस्थेचा अण्णा हजारे सामाजिक गौरव पुरस्कार चार जणांना जाहीर झाला आहेत. बीडच्या गेवराई इथल्या आई संस्थेचे अध्यक्ष संतोष गर्जे यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

****